# रिटेल फायनान्स :-

## १) सुत गिरणी कॅश क्रेडीट :-

सहकारी सुत गिरण्यांची नोंदणी ही हातमाग, यंत्रमाग व सहकारी गिरणी संचालक, महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत केले जाते. सदरचे प्रकल्प हे कमीत कमी २५००० चात्यांची असतात. आपल्या जिल्ह्यामध्ये कापड उद्योग हा कडेगांव, पलूस, तासगांव, आटपाडी, वाळवा या विभागामध्ये कार्यान्वित आहे. उत्पादीत सुताची माधवनगर, विटा व इचलकरंजी या स्थानिक बाजारपेठेत विक्री केली जाते. अशा प्रकारच्या सुत गिरण्यांना जिल्हा बँकेमार्फत खालील प्रकारची कर्जे मंजूर करणेचे धोरण आहे.

## २) सुत गिरणी कॅश क्रेडीट :-

सहकारी सुत गिरण्यांना दैनंदिन व्यवहार हाताळणेसाठी ऐनवेळेला अल्प प्रमाणात खेळत्या भांडवली कर्जाची आवश्यकता असते. अशावेळी कॅश क्रेडीट कर्ज १ वर्षे मुदतीने मंजूर केले जाते. सदरच्या कर्जासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेतल्या जातात.

१) सुतगिरणीचे नेटवर्थ +(अधिक)असले पाहिजे.तसेच एन.डी.आर. व मार्जिन मनी(अधिक)असले पाहिजे.
२) संस्थेस कर्ज मंजूर करताना संस्थेकडील रोख व बँक शिल्लक, माल खरेदी पोटीचे डिपॉझीट, सरकारी रोख्याची गुंतवणूक व शिल्लक माल या बाबींचा विचार केला जातो.
३) कर्जमर्यादाा -
४) व्याजदर -
५) तारण -

(३ ते ५) हे ज्या त्या वेळच्या नाबार्ड/राज्य बँक/आपले बँकेच्या धोरणानुसार राहील.

## २) सुत गिरणी मालतारणगहाण कर्जे :-

मालतारणगहाण कर्जे मंजूर करताना संस्थेचे उपलब्ध विनियोगक्षम भांडवल व भांडवली वाढावा रक्कम या बाबीवर निश्चित केली जाते. या कर्ज प्रकारामध्ये संस्थेकडे उपलब्ध असलेला कापूस व कापसापासून तयार केलेल्या सुताचा समावेश असतो. गिरणीकडील शिल्लक मालापैकी रोखीच्या मालाच्या किंमतीच्या २० % दुराव्याने कर्ज मंजूर केले जाते. तारण घेतले जाणाऱ्या मालाची किंमत ही मार्केटमध्ये असलेल्या दरांची सरासरी घेवून येणाऱ्या दरावर २०% दुरावा ठेवून निश्चित केले जाते.

१)) कर्जमर्यादा -
१) व्याजदर -
२) तारण -

(वरील सर्व) हे ज्या त्या वेळच्या नाबार्ड/राज्य बँक/आपले बँकेच्या धोरणानुसार राहील.

## ३) सुत गिरणी नजरगहाण कर्जे :-

सुत गिरणींना त्यांचेकडे असलेल्या स्टोअर मालाच्या ४० % दुराव्याने माल तारणावर नजरगहाण कर्जे मंजूर केली जाते. या ठिकाणी गत ३ वर्षातील सरासरी प्रत्यक्ष वापरलेल्या नजरगहाण कर्ज मर्यादेचा विचार करुन कर्ज मर्यादा मंजूर केली जाते.

१)) कर्जमर्यादा -
२) व्याजदर -
३) तारण -

(वरील सर्व) हे ज्या त्या वेळच्या नाबार्ड/राज्य बँक/आपले बँकेच्या धोरणानुसार राहील.